**प्रेसनोट** दिनांक १२/०२/२०२१

**ग्रामसेवक वैजिनाथ मोहन चात्रे वय ३९ वर्षे, सज्जा अंबुलगा (बु.) रा. हणमंतवाडी (अंबु.) ता. निलंगा जि. लातूर यांनी पाणीपुरवठा सेवक दत्ता शिवाजी सुर्यवंशी यांचे मार्फतीने २,०००/– रुपयांची लाच स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांचे घरकुलाचा तिसरा हप्ता बॅक खात्यावर जमा होण्यासाठी आवश्यक असलेल्या पंचायत समितीकडे सादर करावयाच्या फॉर्मवर स्वाक्षरी करुन दिली म्हणुन २,०००/–रुपये लाचेची मागणी केली बाबतची तक्रार दिनांक १२/०२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक १२/०२/२०२१ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, ग्रामसेवक वैजिनाथ मोहन चात्रे यांनी मौजे अंबुलगा (बु.) ग्रामपंचायत कार्यालयात तक्रारदार यांचे घरकुलाचा तिसरा हप्ता बॅक खात्यावर जमा होण्यासाठी आवश्यक असलेल्या पंचायत समितीकडे सादर करावयाच्या फॉर्मवर स्वाक्षरी करुन दिली म्हणुन २,०००/–रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

सदर लाचेची रक्कम ग्रामसेवक वैजिनाथ चात्रे यांना देण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालया समोर तक्रारदार गेले असता ग्रामसेवक यांनी त्यांच्या बाजुस उभ्या असलेल्या पाणीपुरवठा सेवक सुर्यवंशी यांचेकडे लाचेची रक्कम देण्यास सांगितले त्याप्रमाणे पाणीपुरवठा सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांचेकडुन २,०००/–रुपये लाचेची रक्कम १३.५७ वाजता मौजे अंबुलगा (बु.) ग्रामपंचायत कार्यालया समोर स्वत: स्विकारली आहे म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

म्हणून तक्रारदार यांनी तिघांच्या विरुध्द पोलीस स्टेशन औराद शहाजनी येथे कलम ७, १२ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

गुन्हाचा तपास पोलीस उपअधीक्षक माणिक बेद्रे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीतआहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शना खाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, बाबासाहेब काकडे, सपोउपनि संजय पस्तापुरे, पोह/रमाकांत चाटे, लक्ष्मीकांत देशमुख, चंद्रकांत डांगे, पोना/मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, अमोल शिंदे, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारीहे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्रीमती कल्पना बारवकर,<br>पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र | :– मोबाईल क्रमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– मोबाईल क्रमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फ्री हेल्प लाईन क्रमांक | :– १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :– ०२४८२–२४२६७४ |
| ७) | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर